**L. A. BILL No. XXVII OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA HIGHWAYS ACT.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७.**

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९५५चा ५५. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र महामार्ग अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९५५ चा अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम १८ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १८ मध्ये, पोट-कलम (३) मधील परंतुकानंतर, पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील आणि ती, १ मार्च २०२५ पासून जादा दाखल करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल :– १९५५ चा ५५.

"परंतु आणखी असे की, राज्य शासनास, जर कालावधी वाढविण्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात आहे असे त्याचे मत असेल तर, उक्त कालावधी एका वर्षापर्यंत वाढविता येईलः

परंतु तसेच, कालावधी वाढविण्याचा असा कोणताही निर्णय, लेखी नोंदविण्यात येईल आणि तो, **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करण्यात येईल आणि भूमिसंपादन अधिकारी, अधिसूचनेचा सारांश, दोन स्थानिक वृत्तपत्रांमध्ये, त्यापैकी एक वृत्तपत्र स्थानिक भाषेतील असेल, प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील.".

व्यावृत्ती.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १८ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(१) १ मार्च २०२४ पासून सुरू होणाऱ्या आणि ३१ मार्च २०२४ रोजी संपणाऱ्या कालावधीमध्ये मुख्य अधिनियमाच्या कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये राज्य शासनाने काढलेल्या ज्या अधिसूचना कलम १८ च्या पोट-कलम (३) च्या तरतुदीनुसार एक वर्षाचा कालावधी व्यपगत झाल्यामुळे अंमलात असण्याच्या बंद झालेल्या आहेत, त्या अधिसूचना,—

(एक) ज्या दिनांकापासून त्या परिणामकारक असल्याचे बंद झाल्या असतील त्या दिनांकापासून ; आणि

(दोन) महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) अधिनियम २०२५ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या पुढील कालावधीसाठी, २०२५ चा महा. .

नियमितपणे अंमलात असल्याचे व परिणामकारक असल्याचे मानण्यात येईल ; आणि

(२) अशा अधिसूचनांन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा हाती घेतलेली कोणतीही कारवाई ही, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींनुसार विधिग्राह्यपणे व कायदेशीरपणे करण्यात आली असल्याचे किंवा हाती घेण्यात आली आल्याचे मानण्यात येईल, आणि अशा अधिसूचना, अंमलात व परिणामकारक नव्हत्या केवळ या कारणावरून कोणत्याही न्यायालयासमोर किंवा प्राधिकरणासमोर हरकत घेतली जाणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महामार्गावर ओळीने इमारती बांधण्यावर निर्बंध घालण्यासाठी, त्यावरील अतिक्रमणास प्रतिबंध करण्यासाठी व ते काढून टाकण्यासाठी, महामार्ग बांधण्यासाठी, ते सुस्थितीत राखण्यासाठी व त्यांचा विकास करण्यासाठी, सुधारणा आकार बसविण्यासाठी आणि इतर विवक्षित बाबींसाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) अधिनियमित केला आहे.

२. उक्त अधिनियमाच्या कलम १५ मध्ये अशी तरतूद केली आहे की, लोकहितार्थ, जेव्हा महामार्गाचे किंवा त्याच्या भागाचे बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यचालन करण्यासाठी कोणतीही जमीन आवश्यक आहे याबाबत राज्य शासनाची खात्री पटली असेल त्या बाबतीत, ते, अशी जमीन संपादन करण्याचा त्याचा इरादा **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जाहीर करू शकेल. उक्त अधिनियमाच्या कलम १८ मध्ये अशी तरतूद केली आहे की, राज्य शासन, अशी जमीन संपादन करण्याचा त्याचा इरादा जाहीर केल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीच्या आत, कलम १५ मध्ये नमूद केलेल्या प्रयोजनांसाठी, अशी जमीन संपादित करण्यात यावी असे **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, जाहीर करील. उक्त कलमामध्ये आणखी अशीही तरतूद केली आहे की, जेव्हा कोणत्याही जमिनीच्या बाबतीत, तिचे संपादन करण्यासाठी कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली असेल, परंतु, ती अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीत पोट-कलम (१) अन्वये कोणतेही घोषणापत्र प्रसिद्ध करण्यात आलेले नसेल त्या बाबतीत, उक्त अधिसूचना अंमलात असल्याचे बंद होईल.

३. तथापि, अन्य तातडीच्या शासकीय कामकाजाचा कार्यभार वाढल्यामुळे, काही भूमिसंपादन अधिकाऱ्यांसमोरील कार्यवाह्या वेळेत पूर्ण करता येऊ शकलेल्या नाहीत. त्यामुळे, काही प्रकरणांमध्ये उक्त अधिनियमाच्या कलम १८ अन्वये तरतूद केलेल्या एक वर्षाच्या कालावधीच्या आत, जमीन संपादन करण्याचे घोषणापत्र प्रसिद्ध करणे शक्य झाले नाही. म्हणून, घोषणापत्र प्रसिद्ध करण्याचा एक वर्षाचा कालावधी वाढविण्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात आहे असे राज्य शासनाचे मत असेल तर, उक्त एक वर्षाचा कालावधी वाढविण्यासाठी राज्य शासनास अधिकार प्रदान करण्याकरिता, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या तरतुदींच्या धर्तीवर, उक्त अधिनियमाच्या कलम १८ ची सुधारणा करणे इष्ट आहे असे शासनास वाटते.

४. दिनांक १ मार्च, २०२४ ते ३१ मार्च, २०२४ या कालावधीमध्ये काढलेल्या ज्या अधिसूचना अंमलात असण्याच्या बंद झालेल्या आहेत अशा अधिसूचना प्रस्तावित विधेयकाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून एक वर्षापर्यंतच्या पुढील कालावधीसाठी नियमितपणे अंमलात आणण्याच्या दृष्टीने, विधेयकाच्या खंड ३ मध्ये व्यावृत्तीच्या खंडाची तरतूद केली आहे.

५. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १९ मार्च, २०२५.

**एकनाथ शिंदे,**
उप मुख्यमंत्री
(सार्वजनिक बांधकाम).

**वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन.**

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :—

**खंड २.**— महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाच्या कलम १८ मध्ये नवीन परंतुके समाविष्ट करण्याचा हेतू असलेल्या या खंडान्वये, उक्त कलमान्वये ज्या कालावधीत जमीन संपादनाचे घोषणापत्र आणखी एक वर्षापर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध करण्याची आवश्यकता आहे तो एक वर्षाचा कालावधी वाढविण्याचा निर्णय, **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा वर नमूद केलेला प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचा आहे.

## सन २०२५ चे वि.स. विधेयक क्रमांक—२७ महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) विधेयक, २०२५ याचे परिशिष्ट.

## (महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ यातील उतारे)

## ( सन १९५५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५.)

**१.** ते **१७.** ** ** **

**१८.** (१) कलम १७ च्या पोट-कलम (१) खाली, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत, जर भूमि संपादन अधिकाऱ्याकडे कोणताही आक्षेप दाखल करण्यात आला नाही किंवा भूमि संपादन अधिकाऱ्याने त्या कलमाच्या पोट-कलम (२) खाली आक्षेप अमान्य केला असेल तर, भूमि संपादन अधिकारी, शक्य होईल तितक्या लवकर, राज्य शासनाकडे तद्नुसार, अहवाल सादर करेल आणि असा अहवाल मिळाल्यावर, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे कलम १५ च्या पोट-कलम (२) मध्ये नमूद केलेल्या प्रयोजनासाठी किंवा प्रयोजनांसाठी ती जमीन संपादन करण्यात यावी अशी घोषणा करेल. संपादनाचे घोषणापत्र.

(२) पोट-कलम (१) अन्वये असे घोषणापत्र प्रसिद्ध झाल्यानंतर, ती जमीन सर्व भारांपासून मुक्त होऊन राज्य शासनाकडे पूर्णपणे निहित होईल.

(३) ज्यावेळी, कोणत्याही जमिनीच्या संबंधात, तिच्या संपादनाबाबत कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये अधिसूचना प्रसिद्ध केलेली असेल, परंतु पोट-कलम (१) अन्वये, ती अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून एक वर्षाच्या आत कोणतेही घोषणापत्र प्रसिद्ध झाले नसेल तर, उक्त अधिसूचना अंमलात असण्याचे बंद होईल :

परंतु, उक्त एक वर्षाच्या कालावधीची गणना करताना, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये जारी केलेल्या अधिसूचनेनुसार करावयाच्या कोणत्याही कृतीस किंवा कार्यवाहीस न्यायालयाच्या आदेशाद्वारे ज्या कालावधी किंवा कालावधींमध्ये तहकुबी मिळालेली असेल, असा कालावधी किंवा असे कालावधी, वगळण्यात येतील.

(४) ** ** **

**१९.** ते **७५.** ** ** **

**अनुसूची** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७.]**

**[महाराष्ट्र महामार्ग अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**
उप मुख्यमंत्री
(सार्वजनिक बांधकाम).**]**

**[विधानसभेने दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.